# परिशिष्टे

## परिशिष्ट 'क'

[ पहा परिच्छेद १ (२) भाग-दोन ]

### मुंबई सराईत गुन्हेगार अधिनियम, १९५९ अन्वये पोलीस पाटलांची कर्तव्ये

(१) प्रत्येक नोंदणीकृत अपराधी जर त्या गावात राहत असेल तर त्याच्या सर्वसाधारण निवासस्थानात होणारा कोणताही बदल किंवा उद्देशित बदल तो पोलीस पाटलांकडे जातीने जाऊन अधिसूचित करील. निवासातील बदलासंबंधी किंवा उद्देशित बदलासंबंधी कळवताना तो उद्देशित नवीन निवासाचे ठिकाण आणि त्याने तेथे जाण्यासाठी ठरविलेला दिवस अधिसूचित करील.

२. (१) ज्याच्या बाबतीत उपस्थिती कळवण्याबाबत निर्बंध घातले असल्याचे आदेश देण्यात आले आहेत अशा प्रत्येक नोंदणीकृत अपराध्याने आदेशात अन्यथा निर्देशित केलेले नसल्यास तो ज्या ग्राम पोलीस पाटलाच्या अधिकार क्षेत्रात राहत असेल त्याच्यासमोर संध्याकाळी ७ ते ९ या दरम्यान पुढीलप्रमाणे स्वतः हजेरी लावील :—

(एक) निर्बंध आदेशाच्या दिनांकापासून पहिले सहा महिने दररोज.

(दोन) त्यापुढील सहा महिन्यात चार दिवसांपेक्षा जास्त नाही एवढ्या कालांतराने, आणि

(तीन) राहिलेल्या कालावधीकरिता दहा दिवसांपेक्षा जास्त नाही एवढ्या कालांतराने, मात्र असे की, जर वर उल्लेखलेल्या कोणत्याही काळात—

(क) अशा अपराध्यावर कोणताही बेकायदेशी अपराध सिद्ध झाल्यास किंवा

(ख) एखाद्या घडलेल्या बेकायदेशी अपराधाशी त्याचा संबंध असल्याचा संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्याला सकारण संशय असेल (त्याने अशा कारणांची लेखी नोंद केली पाहिजे) तर तो खंड (एक), (दोन) आणि (तीन) मध्ये नमूद केलेल्या संपूर्ण कालावधीत त्या खंडात विहित केलेल्या प्रकाराने आपली हजेरी देईल. खंड (क) मधील प्रकरणात हा कालावधी शिक्षा संपण्याच्या दिनांकापासून आणि खंड (ख) मधील प्रकरणात तो संबंधित जिल्हा दंडाधिकारी निदेश देईल त्या दिनांकापासून सुरु होईल.

(२) जर अशा प्रकारची अपराधी स्त्री असेल व आपली उपस्थिती एखाद्या पुरुष नातेवाईकाकरवी कळविण्याची तिची इच्छा असल्यास तिला असे करता येईल, परंतु अशा प्रकारे कळविलेली माहिती खरी नसल्याचे सिद्ध झाल्यास त्याबद्दल होणाऱ्या कोणत्याही शिक्षेबाबत तिला सूट मिळणार नाही.

(३) उपस्थिती कळविण्याचा निर्बंध घालणाऱ्या आदेशामध्ये अन्यथा निर्देशित केले नसेल तर उपस्थिती कळवण्याचे ठिकाण, जिल्हा दंडाधिकाऱ्याला सर्व-

साधारण किंवा खास आदेश देऊन निर्देशित करता येईल, मात्र असे की, जर अशा अपराधी जिल्हा दंडाधिकाऱ्याने ठरवून दिलेल्या ठिकाणापासून दोन मैलांच्या परिसराबाहेर राहात असेल तर तो जिल्हा पोलीस अधीक्षकाने निर्देशित केलेल्या व्यक्तीकडे आपली उपस्थिती कळवील.

३. (१) ज्याला उपस्थिती कळवण्यासंबंधीचा निर्बंध घातल्याचा आदेश देण्यात आला आहे अशा नोंदणीकृत अपराध्याचा स्वतःच्या निवासस्थानी एक किंवा अधिक रात्री अनुपस्थित राहण्याचा इरादा असेल तर तो आपली उद्देशित अनुपस्थिती अधिसूचित करील.

(क) जर तो त्या गावात राहात असेल तर—

(अ) जेव्हा उद्देशित अनुपस्थितीचा कालावधी सात दिवसांपेक्षा जास्त नसेल, तेव्हा त्या गावच्या पोलीस पाटलाकडे अधिसूचित करील.

(ब) जेव्हा उद्देशित अनुपस्थितीचा कालावधी सात दिवसांपेक्षा जास्त असेल तेव्हा त्या गावच्या पोलीस पाटलाकडे आणि संबंधित पोलीस ठाण्याच्या प्रभारी पोलीस अधिकाऱ्याकडे अधिसूचित करील.

(२) अशा प्रकारचा अपराधी जेथे तो रात्रीकरिता वसती करतो, तेथील ग्राम पोलीस पाटलाकडे स्वतःचे येणे आणि त्या ठिकाणाहून जाणे आणि त्याचप्रमाणे जाण्याचे पुढील उद्देशित ठिकाण आणि रात्री मुक्काम करावयाचे ठिकाण हे सर्व अधिसूचित करील.

(३) इष्ट स्थानी पोहचल्यानंतर अशा प्रकारचा अपराधी तेथील ग्राम पोलीस पाटलाकडे आपली उपस्थिती कळवील.

(४) अशा अपराध्याच्या तात्पुरत्या अनुपस्थितीची नोंद करण्यासाठी नमुना 'ग' मधील तात्पुरत्या अनुपस्थिती नमुना वापरण्यात येईल. जेव्हा नोंदणीकृत अपराधी गावात राहत असेल व त्याच्या अनुपस्थितीचा कालावधी सात दिवसा-पेक्षा जास्त नसेल तेव्हा ग्राम पोलीस पाटील हा अनुपस्थिती नमुना देईल.

४. ज्या नोंदणीकृत अपराध्याच्या बाबतीत उपस्थिती कळवण्याचा निर्बंध घालणारा आदेश काढण्यात आला आहे अशा नोंदणीकृत अपराध्याने त्या आदेशामध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे किंवा नियम ८ मध्ये विहित केल्याप्रमाणे उपस्थिती कळवण्याबाबत कसूर केल्यास, अशा गुन्हेगार गावात राहत असेल तर ग्राम पोलीस पाटील नोंदणीकृत अपराध्याच्या उपस्थितीबद्दल खात्री करून घेण्यासाठी दिवसा किंवा रात्री त्याच्या निवासस्थानास भेट देण्यास सक्षम राहील. त्यानंतर अशा अपराधी उपस्थित असल्यास त्याने पोलीस पाटलांच्या किंवा यथास्थिती अशा अधिकाऱ्याच्या समोर जातीने हजर होणे किंवा हजर होण्यास तो शारीरिकदृष्ट्या असमर्थ असल्यास त्याने आपल्या उपस्थितीबद्दल, इतर प्रकारे पोलीस पाटलाची खात्री करून देणे हे त्या अपराध्याचे कर्तव्य राहील.

**टीप.**—या नियमातील उपबंधांनुसार, भेट देणाऱ्या अधिकाऱ्याला नोंदणीकृत अपराध्याच्या निवासस्थानात प्रवेश करण्यास प्राधिकृत करण्यात आलेले नाही.

५. ज्या नोंदणीकृत अपराध्याच्या हालचालींवर निर्बंध घालण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत अशा नोंदणीकृत अपराध्याच्या हालचालींचे क्षेत्र आदेशाद्वारे अन्यथा निर्देशित केले नसल्यास :—

जर त्याचे निवासस्थान गावात असेल तर रात्री ९ पासून पहाटे ५ वाजेपर्यंत गावाच्या सीमापुरते मर्यादित राहील.

६. ज्या नोंदणीकृत अपराध्याच्या हालचालींवर निर्बंध घालणारे आदेश देण्यात आले आहेत अशा नोंदणीकृत अपराध्याने, नियम १४ मध्ये दिलेल्या पद्धतीने नमुना 'ध' मधील पास मिळविल्याशिवाय, ज्या भागापुरत्या त्याच्या हालचालीस निर्बंध घालण्यात आला आहे, तो भाग सोडणार नाही किंवा तेथून अनुपस्थित राहणार नाही.

मात्र असे की निर्बंधाचे क्षेत्र ज्या पोलीस ठाण्याच्या क्षेत्रात आहे त्या पोलीस ठाण्याच्या क्षेत्रापेक्षा ते क्षेत्र लहान असेल तेव्हा निर्बंध घालण्यात आलेल्या व्यक्तीने खुद्द तिच्यावर किंवा तिच्या कुटुंबियांवर परिणाम करणाऱ्या अपराधा-बद्दल तक्रार करण्यासाठी किंवा या नियमांनुसार पासाकरिता अर्ज करण्यासाठी तो ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहत असेल त्या पोलीस ठाण्यावर किंवा कोणत्याही अधिकारीत असलेल्या न्यायालयापुढे हजर राहण्यासाठी, ती व्यक्ती ज्या भागात राहत असेल त्या भागाच्या सीमा तिने ओलांडल्या तर ते या नियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही कारणाने समजले जाणार नाही.

मात्र आणखी असे की, अशी व्यक्ती ते क्षेत्र सोडण्यापूर्वी यथास्थिती स्वतःच्या गावच्या पोलीस पाटलाला तशी सूचना देईल.

७. (१) ज्या गावात निर्बंध घालण्यात आलेली व्यक्ती राहात असेल त्या गावच्या पोलीस पाटील, अशा व्यक्तीच्या हालचालींवर ज्या भागापुरता निर्बंध घालण्यात आला आहे असा भाग एका दिवसापुरता सूर्योदयापासून सूर्यास्ता-पर्यंतच्या काळात सोडून जाण्यास प्राधिकृत करणारा नमुना 'ध' मधील पास अशा व्यक्तींना देऊ शकेल.

(२) संबंधित पोलीस अधीक्षक, निर्बंध घालण्यात आलेल्या व्यक्तीला १५ दिवसांपेक्षा अधिक कालावधीकरिता अनुपस्थित राहण्याची परवानगी देऊ शकेल व तसा पास देऊ शकेल.

(३) या नियमानुसार देण्यात येणाऱ्या कोणताही पासाच्या तीन प्रती तयार करण्यात येतील आणि प्रत्येक भागावर अनुपस्थितीस मंजुरी देणारा अधिकारी सही करील. एक भाग तो अधिकारी स्वतःकडे ठेवील, निर्बंध घालण्यात आलेल्या ज्या व्यक्तीला अनुपस्थिती मंजूर करण्यात आली आहे तिला दुसरा भाग देण्यात येईल व तिसरा भाग, पासधारकाचे इष्ट स्थान ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असेल त्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे पाठवण्यात येईल.

८. (१) निर्बंध घालण्यात आलेल्या ज्या व्यक्तीने नियम १४ अन्वये अनुपस्थितीची परवानगी घेतली असेल अशी व्यक्ती इष्ट स्थानी जाताना व घरी परतताना पासामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मार्गानेच प्रवास करील. इष्ट गावाचा पोलीस पाटील, त्या व्यक्तीच्या येण्याचा दिनांक व वेळ पासावर पृष्ठांकित करील.

(२) जेव्हा अशी व्यक्ती रजेवर नसेल तेव्हा तो दररोज संध्याकाळी त्या गावच्या पोलीस पाटलाकडे हजेरी देईल.

(३) अशी व्यक्ती अनुपस्थितीच्या मंजूर कालावधीपेक्षा अधिक काळ बाहेर राहणार नाही.

(४) अशी व्यक्ती आपल्या इष्ट ठिकाणी मुक्कामास असताना स्वतःच्या निवासस्थानी सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतच्या कोणत्याही वेळी अनुपस्थित राहणार नाही किंवा दिवसभरात स्वतःच्या निवासस्थानापासून पाच मैलांच्या मर्यादेबाहेर जाणार नाही.

(५) अशी व्यक्ती आपल्या निवासस्थानास परतण्यापूर्वी तेथील पोलीस पाटलाकडून निघण्याची वेळ व दिनांक आपल्या पासावर पृष्ठांकित करून घेईल व निवासस्थानी परतल्यावर ज्याच्याकडून पास घेतला होता त्या ग्राम पोलीस पाटलाला तो पास परत करील, असा पास, जर मुळात पोलीस अधीक्षकाने दिला असेल तर पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकारी तो पास त्याच्याकडे पाठवील.

९. नियम १४ अन्वये दिलेला पास तो देणाऱ्या प्राधिकाऱ्याला कोणत्याही वेळी परत घेता येईल व त्यामुळे दिलेली परवानगी रद्द होईल. (परिशिष्ट 'ख' भाग एक मधील परिच्छेद ६ पहा)

नमुना 'घ'

[ पहा : परिशिष्ट 'क' चा परिच्छेद २(४) ]

तात्पुरती अनुपस्थिति नमुना

.............................(नाव) ............यांचा/

यांची मुलगा/पत्नी.

जात..................                                नोंदणी क्रमांक ........

डाव्या बाजूप्रमाणे

...............या गावाचा/ची रहिवासी ज्याने/जिने आपल्या निवासापासून अनुपस्थित राहण्याचा हेतू अधिसूचित केला आहे, त्याला/तिला देण्यात आला आहे.

त्याने/तिने जाण्याचे योजिलेले/ली ठिकाण/ठिकाणे आणि त्याने/तिने ज्याच्याबरोबर राहावयाचे योजले आहे अशा व्यक्ती.

| ठिकाण | संभाव्य दिनांक | जेथे तो/ती थांबेल त्या व्यक्ती किंवा ठिकाण | मुक्कामाचा संभाव्य कालावधी |
|---|---|---|---|
| | | | |

वय आणि ओळखण्याच्या खुणा किंवा अंगठ्याचा ठसा.

पोलीस ठाण्याचे/गावाचे नाव ..

निगमन दिनांक १९

पोलीस ठाण्यातील प्रभारी अधिकाऱ्यांची किंवा नमुना देणाऱ्या त्या गावातील पोलीस पाटलाची सही.

नमुना 'घ'

[ पहा : परिशिष्ट 'क' चा परिच्छेद ६ ]

उत्पादिक क्षेत्रात अनुपस्थितीची परवानगी ज्यांना देण्यात आलेली आहे त्या व्यक्तींना द्यावयाचा पास.

१. अनुक्रमांक .. ..

२. नाव आणि पित्याचे नाव किंवा पतीचे नाव.

३. स्त्री/पुरुष आणि वय ..

४. जात आणि पोट जात ..

५. अनुपस्थितीचा मंजूर केलेला कालावधी. .. ......पासून ......पर्यंत

६. जाण्याचे ठिकाण ..

७. जाण्याचा मार्ग .. केव्हा निघणार
केव्हा परतणार

८. कोणत्या कामासाठी जात आहे ..

९. ज्या पोलीस ठाण्यातून परवानगी देण्यात आली त्याचे नाव आणि परवानगी दिल्याचा दिनांक.

१०. ज्याला परवानगी देण्यात आली आहे त्या व्यक्तीच्या डाव्या अंगठ्याचा ठसा.

पास देणाऱ्या अधिकाऱ्याची सही.

दिनांक आणि वेळ ..

| घर सोडल्याचा | पुढील ठिकाणी आल्याचा | पोलीस ठाण्यात उपस्थिती कळविल्याचा | पुढील ठिकाणाहून निघाल्याचा | घरी परतल्याचा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

धारकाने स्वतःची उपस्थिती कळविलेल्या व्यक्तीची सही.

पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याचा शेरा.